महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०७/१२/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१८२३/ प्र.क्र. २४/१८-अ, दिनांक ०५ डिसेंबर, २०२३.

**विषय :-** QCI मार्फत नियुक्त Kaizen Institute या संस्थेस टपाल व्यवस्थापन, ई ऑफिस वापरास प्रोत्साहन देणे, जुन्या नस्त्यांचा अनुशेष नि काली काढणे याकरिता नियुक्ती देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१८२३/ प्र.क्र.२४/१८-अ , दिनांक ०५ डिसेंबर, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३१२०५१७१०३४६३०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह )
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with CamScanner

QCI मार्फत नियुक्त Kaizen Institute या संस्थेस टपाल व्यवस्थापन, ई ऑफिस वापरास प्रोत्साहन देणे, जुन्या नस्त्यांचा अनुशेष निकाली काढणे याकरिता नियुक्ती देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण १८२३/प्र.क्र.२४/१८-अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ डिसेंबर, २०२३.

संदर्भ :- Kaizen Institute या संस्थेचा दिनांक १९/५/२०२३, १९/७/२०२३ व २६/७/२०२३ चा ई मेल संदेश.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयीन कार्यपध्दती व नियम पुस्तीका, २०२३ नुसार टपाल व्यवस्थापन, ई ऑफिस वापरास प्रोत्साहन देणे, जुन्या नस्त्यांचा अनुशेष निकाली काढणे, याकरिता मॅपिंग, डिजिटलायझेशन, गॅप ॲनालिसिस प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी ,काउंटरमेजर्स ओळखण्यासाठी आणि कामाच्या ठिकाणी कार्यक्षमता सुधारण्यासाठी QCI मार्फत Kaizen Institute या त्रयस्थ संस्थेस प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यासाठी नियुक्ती देण्यास व त्यासाठी निधी वितरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासाठी मा. मुख्यमंत्री कार्यालय , मा. उपमुख्यमंत्री कार्यालय, मा. मुख्य सचिव कार्यालय व मध्यवर्ती टपाल केंद्र या विभागांची प्रायोगिक तत्वावर निवड करण्यात आलेली आहे. सबब, उक्त नमूद बाबींची पूर्तता करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयीन कार्यपध्दती व नियम पुस्तीका २०२३ नुसार टपाल व्यवस्थापन, ई ऑफिस वापरास प्रोत्साहन देणे, जुन्या नस्त्यांचा अनुशेष निकाली काढणे, याकरिता मॅपिंग, डिजिटलायझेशन, गॅप ॲनालिसिस प्रक्रिया सुव्यवस्थित करणे, काउंटरमेजर्स ओळखणे आणि कामाच्या ठिकाणी कार्यक्षमता सुधारण्यासाठी QCI मार्फत Kaizen Institute या संस्थेमार्फत कामकाज करण्यास रू.६७,२०,०००/ (सदुसष्ट लाख वीस हजार फक्त) एवढया खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

२. प्रस्तुत प्रकरणी खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | विषय | रक्कम | ३ महिन्याकरीता वितरणाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | प्रति महिना व्यवसायीक फी (प्रती नियुक्ती प्रमाणे) | रू. १६,००,००० | रू. ४८,००,००० |
| २. | प्रवास खर्च, निवास व्यवस्था व इतर खर्च | रू. ४,०० ००० | रू. १२,००,००० |
| ३. | QCI संस्थेचे प्रशासकीय व सेवा शुल्क | १२% of Total (अ.क्र.१+२) | रू. ७,२०,००० |
| **काम सुरू झाल्यापासून तीन महिन्याकरीता होणारा एकूण खर्च** | | | **रू. ६७,२०,०००** |

३. उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार QCI मार्फत नियुक्त Kaizen Institute या संस्थेस निधी वितरण करण्याची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निधी वितरण टक्केवारी | कामाचे स्वरूप | अदा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २०% | मोबिलायझेशनसाठी व्यवसायीक फी | रू.१३,४४,०००/- |
| २. | २५% | डिझाईन व असेसमेंटच्या परिपूर्णते करीता | रू.१६,८०,०००/- |
| ३. | २५% | बिल्ड /एक्झिक्युट टप्याकरिता | रू.१६,८०,०००/- |
| ४. | २५% | सस्टेन स्टेज करिता | रू.१६,८०,०००/- |
| ५. | ५% | प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर | रू.३,३६,०००/- |
| | | **एकूण रक्कम** | **रू.६७,२०,०००/-** |

४. सदर निधी कोषागारातून आहरण व संवितरण करण्याकरिता कक्ष अधिकारी कार्यासन-२६ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. QCI मार्फत नियुक्त Kaizen Institute या संस्थेस मुल्यमापन अभ्यास करण्याकरीता मार्गदर्शक सुचना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे:-

- मा. मुख्यमंत्री कार्यालय, मा. उपमुख्यमंत्री कार्यालय,मा.मुख्य सचिव कार्यालय व मध्यवर्ती टपाल केंद्र यामधील टपाल व्यवस्थापन, ई ऑफिस वापरास प्रोत्साहन देणे, जुन्या नस्त्यांचा अनुशेष निकाली काढणे याकरिता QCI मार्फत Kaizen Institute या संस्थेने त्याअनुषंगाने मूल्यमापन अभ्यास करून मूल्यमापन अहवालाचा हेतू आवश्यकता आणि उद्दिष्टे विचारात घ्यावीत.



Scanned with CamScanner

- मुल्यमापन अभ्यासाबाबतचा कालबध्द कार्यक्रम दिनांक १८ डिसेंबर, २०२३ पासून तीन महिन्याच्या कालावधीत राबविणे Kaizen Institute या संस्थेस बंधनकारक राहील.
- QCI मार्फत नियुक्त Kaizen Institute या संस्थेचे सर्व कामकाज सचिव/प्र.स./अ.मु.स.(प्र.सु.र.व का.) यांचे पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली पार पाडण्यात येईल.
- QCI मार्फत Kaizen Institute या संस्थेस मुल्यमापन अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती पुरविण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.
- मूल्यमापन अहवाल हा वस्तुनिष्ठ पुराव्यावर आधारित शासनास सादर करण्याची जबाबदारी QCI मार्फत Kaizen Institute या संस्थेची राहील.
- मूल्यमापन अभ्यास पूर्ण केल्यानंतर त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल, करावयाच्या उपाययोजना व शिफारशीसह QCI मार्फत Kaizen Institute या संस्थेकडून शासनास विहित कालमर्यादेत सादर करण्यात यावा.

६. यावर होणारा खर्च हा ई गव्हर्नन्स या बाबी अंतर्गत मागणी क्रमांक ए-४, २०५२, सचिवालय, सर्वसाधारण सेवा (००)(१७) ई गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्याकरिता तरतूद (कार्यक्रम)(२०५२ ५०८१) १७ संगणक खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या मंजुर तरतुदीतून भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय हा नियोजन विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २८३-अ/का.१४४३, दि.२६/१०/२०२३ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे तसेच सदर प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच QCI मार्फत Kaizen Institute या संस्थेस निधी वितरीत करण्याची कार्यवाही केली जाईल.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२३१२०५१७१०३४६३०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ROSHANI DINESH KADAM PATIL

Digitally signed by ROSHANI DINESH KADAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad837675 5d0e815a1eb20fd0ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=16D26A3CE7C86CC341C246E6BB468A80B20659C CB13144AF609F03226E90BA0C, cn=ROSHANI DINESH KADAM PATIL
Date: 2023.12.05 17:10:58 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
शासनाचे उपसचिव

**प्रत :**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव (पत्राने)
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२
४) सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२



Scanned with CamScanner

५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई ४०००३२
६) सर्व मा.संसद सदस्य / विधानसभा सदस्य / विधानपरिषद
७) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२
८) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२
९) सर्व मंत्रालयीन विभाग.
१०) सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन- २५ व २६ मंत्रालय, मुंबई ४०००३२
११) निवड नस्ती (का.१८अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.



Scanned with CamScanner